News Paper:- सकाळ
Date:- ६ डिसेंबर २०११

# दिल्लीत साकारणार आंबेडकर स्मारक!

## नरेंद्र जाधव यांची माहिती

सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. ५ : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिल्ली येथील स्मारकासाठी खुद्द पंतप्रधानांनी पुढाकार घेतला आहे. आगामी केंद्रीय अर्थसंकल्पात यासाठीच्या विशेष तरतुदीसाठी प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती स्मारक समितीचे अध्यक्ष व योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिली.

दिल्लीतील आंबेडकर निर्वाणभूमी म्हणून ओळखले जाणारे २६, अलीपूर रस्ता आणि १५, जनपथ येथे डॉ. आंबेडकरांच्या भव्य स्मारकासाठी तसेच डॉ. आंबेडकर सामाजिक न्याय अभ्यास केंद्रासाठी सरकारने जागा निश्चित केली आहे. स्मारकाच्या आराखड्यासाठी जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीत अर्थ, सांस्कृतिक तसेच सामाजिक न्याय मंत्रालयांच्या वरिष्ठ सचिवांसह अकरा तज्ज्ञांचा समावेश आहे. यात डॉ. डी. एन. संदानशिव, प्रा. गेल आम्वेट, डॉ. एम. एल. कासारे, लता प्रियाकुमार, अखिल भारतीय भिक्खू महासंघाचे सदानंद भन्ते आदींचा समावेश आहे.

News Paper:- सामना

Date:- 2 Dec 2011

# दिल्लीत डॉ. आंबेडकर सेंटरसाठी लगबगीने ३ एकर

**दिवाकर शेजवळ**

मुंबई, दि. १ - चैत्यभूमीला इंदू मिलची साडेबारा एकर जमीन मिळविण्यासाठी आंबेडकरी जनतेच्या होऊ घातलेल्या आंदोलनाला 'पंक्चर' करण्यासाठी का होईना केंद्रातील यूपीए सरकारला नवी दिल्लीतील 'निर्वाणभूमी'च्या विकासाला हात घालणे भाग पडले आहे. त्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करतानाच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल सेंटर फॉर सोशल जस्टीस'च्या उभारणीसाठी १५ जनपथ येथे तीन एकरांचा भूखंड पंतप्रधानांनी बुधवारी दुपारी लगबगीने वितरित केला आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अखेरचा श्वास घेतलेल्या २६ अलीपूर रोड या राष्ट्रीय स्मारकाच्या विकासासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. त्या समितीच्या अध्यक्षपदी केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या समितीमध्ये एकूण १५ सदस्यांचा सहभाग आहे. त्यात महाराष्ट्रातून डॉ. डी. एन. संदानशिव, प्रा. गेल ऑमवेट, डॉ. एम. एल. कासारे आणि भिक्खू संघाचे अध्यक्ष भदंत सदानंद यांचा पान ८


# दिल्लीत डॉ. आंबेडकर सेंटरसाठी लगबगीने ३ एकर


*(पान १ वरून)* समावेश आहे. नवी दिल्लीतील बाबासाहेबांच्या 'निर्वाण भूमी'ला राजघाटाचा दर्जा देण्यात यावा, या मागणीसाठी मध्य प्रदेशातील इंद्रेश गजभिये यांच्यां नेतृत्वाखाली गेली काही वर्षे सतत आंदोलन सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर, निर्वाणभूमीवरील स्मारकाच्या विकासासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन झाली आहे. पण त्यामुळेच चैत्यभूमीसाठी इंदू मिलची जमीन देण्याचा निर्णय इतक्यात घेण्याची शक्यता मात्र धुसर झाली आहे.

दरम्यान, निर्वाणभूमीवरील राष्ट्रीय स्मारकाचा तज्ज्ञांच्या मदतीने ठोस आराखडा आपण तीन महिन्यांत केंद्र सरकारला सादर करू, अशी माहिती स्मारकासाठी स्थापन झालेल्या उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिली. तर, निर्वाणभूमी येथे मंगळवारी महापरिनिर्वाण दिनी अभिवादनासाठी सन्मान सभेचे आयोजन केले आहे. त्या सभेला भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन गडकरी यांच्यासह सर्वच पक्षांचे मान्यवर नेते उपस्थित राहतील, असे इंद्रेश गजभिये यांनी दैनिक 'सामना'ला सांगितले.

**सामाजिक न्याय केंद्र**

१५ जनपथ येथील तीन एकरांच्या भूखंडावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'नॅशनल सेंटर फॉर सोशल जस्टीस' हे भव्य केंद्र उभे राहणार आहे. त्यात सार्वजनिक ग्रंथालय, संशोधन- अभ्यास केंद्र, मीडिया कम्युनिकेशन सेंटर अशी स्वतंत्र दालने असतील.

पुढारी | सोमवार ५ डिसेंबर २०११

# उपेक्षित 'निर्वाणभूमी'वर भव्य स्मारक

## केंद्र सरकारचा निर्णय : डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना



नवी दिल्ली : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या २६, अलिपूर रोडवरील निर्वाणभूमी स्मारकातील डॉ. आंबेडकर यांचा पुतळा.

**नवी दिल्ली : पुढारी न्यूज नेटवर्क**

'हम तो निकले थे राम मंदिर बनाने, वो तो नहीं बना पाए, लेकिन इस स्मारक के रूप में हमने भीम का मंदिर तो आज बना लिया!' हे उद्गार आहेत तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे. दिवस होता २ डिसेंबर २००३. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अंतिम श्वास घेतला त्या २६, अलिपूर रोडवरील निवासस्थानाचे राष्ट्रीय स्मारक म्हणून रालोआ सरकारने लोकार्पण केले तो दिवस. तेव्हापासून सलग दोनदा केंद्रात सत्तेत आलेल्या काँग्रेस सरकारने या स्मारकाकडे फारसे लक्ष दिले नाही; परंतु उत्तर प्रदेशच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून डॉ. बाबासाहेबांच्या दिल्लीतील निवासस्थानी भव्य स्मारक उभारण्याचा



**"बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले ती वास्तू 'निर्वाणभूमी' आहे. त्यामुळे कोट्यवधी दलितांसाठी ते प्रेरणास्थान आहे. त्या जागी बाबासाहेबांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी १६ जणांची तज्ज्ञ समिती नेमली आहे. याशिवाय जनपथवर बाबासाहेबांच्या नावाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे सामाजिक न्याय अभ्यास केंद्र उभारण्यासाठी ही समिती अहवाल तयार करणार आहे. येत्या दोन महिन्यांत अभ्यास करून निधीची तरतूद करण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांची भेट मी स्वत: घेणार आहे. जेणेकरून आगामी अर्थसंकल्पात तशी तरतूद करता येईल.**

**- डॉ. नरेंद्र जाधव, सदस्य, केंद्रीय नियोजन आयोग."**

निर्णय सामाजिक न्याय मंत्रालयाने नुकताच जाहीर केला आहे. याशिवाय जनपथवर सुमारे तीन एकर जमीन अधिग्रहित करण्यात आली असून, या ठिकाणी ग्रंथालय व सामाजिक न्याय अभ्यास केंद्र उभारण्याचा सरकारचा मानस आहे. यासाठी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या सूचनेवरून सामाजिक न्याय व कल्याणमंत्री मुकुल वासनिक यांनी केंद्रीय नियोजन आयोग व राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव पान ९ वर»

## ...'निर्वाणभूमी' स्थळी भव्य स्मारक

यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. प्रस्तुत समिती येत्या दोन महिन्यात आपला अहवाल सादर करणार आहे.प्रस्तावित स्मारकास भेट दिली असता भव्य वास्तूचे दर्शन होते. परंतु, येथे ना सुरक्षा रक्षक असतो, ना एखादा सरकारी अधिकारी. कंत्राटी कामगार आपल्या स्वागतास येतो. १४ एप्रिल व ६ डिसेंबर जवळ आला की या वास्तूची डागडुजी, रंगरंगोटी सुरू होते. या ठिकाणी भेट देण्यासाठी आलेल्या डॉ. अनिता सूर्यवंशी यांनी केंद्र सरकारच्या उदासीन धोरणाविषयी नाराजी व्यक्त केली. अन्य नेत्यांच्या, महापुरुषांच्या स्मारकांना भव्य स्वरूप देणाऱ्यांना बाबासाहेबांच्या नावाने एकही स्मारक दिल्लीत उभारता येऊ नये का, असा प्रश्नही त्या प्रस्तुत प्रतिनिधीकडे उपस्थिती करतात. विशेष म्हणजे अनिता सूर्यवंशी यांचे वडील विठ्ठलराव कांबळे हे बाबासाहेबांचे शिष्य होते. आजही मिलिंद महाविद्यालयात बाबासाहेबांसमवेत माझ्या वडिलांचे छायाचित्र असल्याचे त्या आवर्जून सांगतात. २६, अलिपूर रोडवरील या वास्तूत बाबासाहेबांच्या जीवनातील अंतिम पर्वातील (१९५१ नंतरची) शंभरेक छायाचित्रे आहेत. त्यांचा अपवाद वगळता बाबासाहेबांच्या दैनंदिन वापरातील एकही वस्तू, पुस्तक येथे नाही.सुमारे अर्धा एकर परिसरात असलेल्या २६ अलिपूर रोडवरील घरात बाबासाहेब १९५१ मध्ये राहायला आले. हिंदू कोड बिलावरून सरकारशी मतभेद झाल्याने स्वाभिमानी बाबासाहेबांनी कायदेमंत्रिपदाचा तडकाफडकी राजीनामा दिला. त्यामुळे त्यांना सरकारी निवासस्थान सोडणे भाग होते. त्याचवेळी राजस्थानमधील सिरोही येथील महाराजांनी बाबासाहेबांना २६ अलिपूर रोडवरील बंगला दिला. बाबासाहेबांच्या निधनानंतर मूळ मालकाकडून करवसुलीसाठी सरकारने हा बंगला लिलावात काढला. त्यानंतर या बंगल्याची मालकी आली जिंदाल उद्योग समूहाकडे. कोल्हापूर येथील प्रा. उमेशकुमार सम्यक यांनी दिलेल्या माहितीनुसार विश्व बौद्ध परिषदेतर्फे उत्तर प्रदेशच्या सुशीला गिहारा यांनी या वास्तूचे राष्ट्रीय स्मारक होण्यासाठी आंदोलन केले होते. परिषदेने १७ जून १९९६ ते १४ फेब्रुवारी १९९७ पर्यंत जेल भरो आंदोलन केले. या आंदोलनाला सन २००० मध्ये यश आले. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची मनधरणी करून माजी केंद्रीय मंत्री सत्यनारायण जटिया यांनी जिंदाल उद्योग समूहाकडून २६, अलिपूरचा ताबा मिळवला. त्यानंतर २००३ मध्ये या वास्तूचे लोकार्पण करण्यात आले. या ठिकणी सध्या बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाची विशेषत: अंतिम दिवसातील कार्यबाहुल्याची ओळख देणारी चित्रमय प्रदर्शनी लावण्यात आली आहे. या प्रदर्शनीचा अपवाद वगळता या वास्तूत बाबासाहेबांच्या उपयोगातील एकही वस्तू नाही अथवा त्यांची पुस्तके देखील नाही. वाचनालय असले तरी ते कायमस्वरूपी बंद असल्याची माहिती येथील कंत्राटी कर्मचाऱ्याने दिली. बाबासाहेब राहात होते त्या मूळ वास्तूचे नामोनिशाणदेखील येथे शिल्लक राहिलेले नाही. संपूर्ण वास्तू नवीन असल्याची माहिती येथील कर्मचाऱ्यांनी दिली. आता तरी या वास्तूची अवस्था सुधारली आहे. तीन वर्षांपूर्वी या ठिकाणी कचरा, भंगार वाहने असायची. परंतु, २००३ मध्ये डॉ. आंबेडकर फाऊंडेशनच्या अधिकाऱ्यांनी सर्व अतिक्रमण हटवून या परिसराची स्वच्छता केली.मायावतींच्या हत्तीने गत लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला चिरडून दलित राजकारणाला नवे आयाम दिलेत. त्याची सल आजही काँग्रेसला विसरता आलेली नाही. त्यातच विरोधकांना शह देत बहेनजी मायावती यांनी दलित प्रेरणा स्थळाचे उद्घाटन करून विरोधकांची गोची करून ठेवली. प्रेरणा स्थळाच्या उभारणीवर टीका केली, तर दलित मते दूर जातील अन् कौतुक केले, तर मायावतींचे वर्चस्व वाढेल, अशा दुहेरी कोंडीत काँग्रेस असल्याची कबुली एका ज्येष्ठ नेत्याने 'पुढारी'कडे दिली. त्यापेक्षा २६, अलिपूर रोडवरील वास्तूला भव्य स्वरूप देण्याची योजना केंद्र सरकारने आखली. 'उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे,' असे वर्णन डॉ. आंबेडकरांचे केले जाते. त्यामुळे स्मारक उभे केल्याने त्यांचे महत्त्व कमी जास्त होणार नाही. परंतु, राजकीय इच्छाशक्तीच्या जोरावर २६, अलिपूर रोडवर राष्ट्रीय स्मारक आणि जनपथवरील सुमारे ३ एकर जागेत डॉ. आंबेडकर सामाजिक न्याय अभ्यास केंद्र उभारण्याचे आश्वासन केंद्र सरकारने पूर्ण केल्यास समतेसाठी लढणाऱ्या सर्वांना ते चिरकाल प्रेरणादीय ठरेल.

# उच्च शिक्षणासाठी खासगी क्षेत्राचा पुढाकार हवा

८।१२।११.

## डॉ. नरेंद्र जाधव यांची भूमिका

म. टा. प्रतिनिधी ■ पुणे
matapune@indiatimes.com

उच्च शिक्षण क्षेत्रात भारत-अमेरिकेतील भागीदारीचा विचार करताना सरकारबरोबरच खासगी क्षेत्राने पुढाकार घेत विद्यापीठस्तरीय करार, संशोधन, विद्यार्थी हस्तांतरण यासाठी कायमस्वरूपी व्यासपीठ निर्माण करण्याची गरज आहे, असे विचार केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी मांडले.

अलायन्स फॉर यूएस-इंडिया बिझनेस (एयूएसआयबी), स्टेट लेजिस्लेटिव्ह लिडर्स फौंडेशन (एसएलएलएफ) आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठातर्फे गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या अमेरिका-भारत उच्च शिक्षण परिषदेत ते बोलत होते.

भारताच्या आगामी बाराव्या पंचवार्षिक योजनेत देशाचा सर्वाधिक भर हा उच्च शिक्षणावर ठेवण्यात आला आहे, असे नमूद करुन डॉ. जाधव म्हणाले, 'उच्च शिक्षणावर भर देतानाच या क्षेत्रामध्ये जागतिकीकरणाला सामावून घेण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे भारत-अमेरिकेतील शैक्षणिक करारांसाठी एक खात्रीशीर व्यासपीठ निर्माण होण्याची आवश्यकता आहे. सरकारी स्तरावर दोन्ही देशातील शैक्षणिक क्षेत्रासंबंधी अद्ययावत क्षेत्रांची माहिती देण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर विशेष केंद्र स्थापन करायला हवे.'

क्रेडिट ट्रान्सफर, भारतीय-अमेरिकी विद्यापीठांचा एकत्रित पदवी कार्यक्रम अशा वेगवेगळ्या माध्यमांतून दोन्ही देशांतील शैक्षणिक सहकार्य वाढू शकेल. मात्र दुसरीकडे अमेरिकेचे अध्यक्ष डॉ. बराक ओबामा यांनी पुढाकार घेत केलेल्या भारत-अमेरिका कराराला दोन्ही देशांकडून प्रतिसाद कमी मिळत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

अमेरिकेतील शिक्षण संस्थांमध्ये भारतीय वंशाचे अनेक प्राध्यापक आहेत. या प्राध्यापकांना काही वर्षांसाठी भारतीय विद्यापीठांमध्ये अध्यापनासाठी आमंत्रित करता आल्यास खऱ्या अर्थाने ज्ञान-तंत्रज्ञानाचे आदान प्रदान होईल, असा विश्वास डॉ. जाधव यांनी व्यक्त केला.

पुढारी पुणे गुरुवार
८ डिसेंबर २०११

# 'विद्यापीठ प्रशासकां'साठी स्वतंत्र संस्था हवी : डॉ. जाधव

**पुणे : प्रतिनिधी**

संशोधन आणि उच्च शिक्षणाच्या प्रगतीसाठी देशातील विद्यापीठांमध्ये उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता आणि प्रशासकीय दर्जाच्या प्रशिक्षित कुलगुरूंची नियुक्ती होणे आवश्यक असून, त्यासाठी स्वतंत्र संस्थेच्या स्थापनेची देशाला आवश्यकता आहे, असे मत केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

भारत-अमेरिका शैक्षणिक परिषदेच्या तिसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात डॉ. जाधव यांनी उच्च शिक्षणविषयक विचार व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, अलायन्स फॉर यूएस-इंडिया बिझनेसचे अध्यक्ष संजय पुरी उपस्थित होते. डॉ. जाधव म्हणाले की, भारत आणि अमेरिकेपुढे शैक्षणिकदृष्ट्या आजही काही आव्हाने आहेत.

दोन्ही देशांतील विद्यार्थ्यांना एकमेकांच्या देशातील उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्यासाठी दोन्ही देशांमध्ये संयुक्तरीत्या सहकार्याचा सेतू निर्माण व्हायला पाहिजे. त्याचा उपयोग दोन्ही देशांतील विद्यार्थ्यांना सकारात्मक आणि अर्थपूर्ण माहिती मिळण्यास होईल. या परिषदेच्या माध्यमातून सकारात्मक पावले टाकण्याची दोन्ही देशांना संधी चालून आली आहे. दोन्ही देशांतील शैक्षणिक प्रशासकीय दृष्टिकोनातून, 'नॅशनल सेंटर फॉर ॲकॅडेमिक ट्रान्सफोरमेशन' ची स्थापना व्हायला हवी. त्याद्वारे दोन्ही देशांतील विद्यापीठांच्या पदव्यांच्या संदर्भातही विचार होऊ शकेल. केंद्रीय नियोजन आयोगातर्फे १२व्या पंचवार्षिक योजनेत शिक्षण, उच्चशिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा यावर भर देण्यात येणार आहे.

दोन्ही देशांतील विद्यापीठांनी एकत्रित येऊन संयुक्त संशोधन प्रकल्प, विद्यापीठांमध्ये होत असलेले विविध प्रकारचे कार्यक्रम, विद्यार्थी आणि शिक्षकांच्या आदान-प्रदानाच्या माध्यमातून कार्य करणे गरजेचे आहे. तसेच दोन्ही देशांतील उच्च शैक्षणिक वृद्धीसाठी सातत्याने सकारात्मक चर्चा होत राहिल्यास विद्यार्थ्यांसाठी ती उपयुक्त ठरेल, असेही जाधव यांनी सांगितले.